शासन वि. राजेश

**<u>फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन</u>**

**<u>भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४ ची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः प्रकाश रघुनाथ पवार,

वयः४९ वर्षे, व्यवसायः भेळ विक्री,

राहणारः वरसगाव, ता.रोहा, जि.रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :</u>**

०१. दि. ०२.०७.२०१७ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरिता बोलाविले नव्हते. सदर दिवशीचे पंचनाम्यावर माझी सही आहे. परंतु, त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०२/०७/२०१७ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच प्रकाश विठोबा तेलंगे याला कुंडलीका नदी पुलावर रेल्वे ट्ॅकवर असलेल्या घटनास्थळी बोलावीले होते, घटनास्थळ आम्हाला फिर्यादी प्रनय गुरव याने दाखविले होते, फिर्यादीने आमचे समक्ष तो ट्ेनमधुन प्रवास करित असताना त्याचे हातावर काठी कारुन त्याचे हातातील मोबाईल फोन पाडल्याचे सांगितले होते, त्या प्रमाणे पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, त्यावर मी वाचून सही केली.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे

नाही की, त्यामुळे मी त्याला वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एन.जी.देशमुख यांनी नाकारला.**

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.01.08 16:17:37 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०८.०१.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.